# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

## व्दितीय सत्र परीक्षा 2019–20

विषय – मराठी

समय –2.00 घंटे | वर्ग – **8 (A,C,D,E,F,)** | गुण – 50

---

**प्रश्न 1ला अ पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सुचनांनुसार कृती कराः**

अचानक तेथे भुकेने व्याकूळ झालेल्या एका मुलाने आपल्या वडिलांकडे बिस्किटांची मागणी केलेली ईशानने पाहिले. वडिलांनी जेव्हा दुकानदाराला बिस्किट पुडयाची किंमत विचारली तेव्हा तो म्हणाला ''बिस्किटांचा एक पुडा शंभर रूपयांना मिळेल आणि पाण्याची बाटली दोनशे रूपयांना मिळेल.''

दुसरा एक हॉटेल मालक जेवणाच्या थाळीची किंमत दोन हजार रूपये वसूल करत होता. दुकानदारांची ही मनमानी पाहून ईशान आणि त्याचे साथीदार हैराण झाले होते. ते विरोध करत दुकानदाराला म्हणाले, ''काका, ही तर सरळ लूटमार आहे. पाच रूपयांत मिळणाऱ्या बिस्किट पुड्याची किंमत शंभर रूपये आणि पंधरा रूपयांच्या पाण्याच्या बाटलीची किंमत दोनशे रूपये कशी काय असू शकते ?''

''मुलांनो, तुम्ही आपले काम करा. येथे पहाडावर वस्तू याच भावाने मिळतात. ज्याला गरज वाटेल, तो खरेदी करेल.'' दुकानदार रागाने म्हणाला.

ईशान आणि त्याचे साथीदार गप्प बसले. त्यांनी अडचणीत सापडलेल्या यात्रेकरूंना मदत केली. जखमी यात्रेकरूंवर प्रथमोपचार केले. त्यांची मलमपट्टी केली आणि औषधे दिली. हरवलेल्या यात्रेकरूंचा शोध घेण्यासाठी त्यांना मदत केली. आणि भुकेल्या मुलांना आपल्या बरोबर आणलेली फळे, बिस्किटे व पाण्याच्या बाटल्या दिल्या. ईशान आणि त्याच्या साथीदारांना भूक लागली होती. त्यांना विश्रांतीची गरज जाणवत होती. पहाडाच्या कडेला एक हॉटेलसारखे घर दिसल्यावर ते मोठ्या आशेने घरमालकाकडे गेले आणि म्हणाले, ''काका, आम्हाला खाण्यासाठी थोडे अन्न आणि रात्रभर मुक्काम करण्यासाठी एखादी खोली देऊ शकाल?''

''हो, परंतु जेवणासाठी दहा हजार आणि खोलीचे भाडे पंधरा हजार रूपये द्यावे लागेल. ''दुकानदार काहीशा रूक्ष स्वरात म्हणाला.

अचानक पहाडावरील एक घर मोठा आवाज होऊन खाली कोसळले. सर्वजण पडलेल्या घरात दाबले गेले. घरात राहणारे लोक देवदारच्या झाडात अडकले होते. तो जाड व मजबूत दोराच्या साहायाने खाली उतरला आणि अडकलेल्या त्या सर्वांना बाहेर काढले.

त्यांनी आपल्या बरोबर नायलॉनचा तंबू आणला होता. पहाडावर झालेल्या या दुर्घनेची माहिती सेनेला मिळाली होती आणि हवाईदलाच्या हेलिकॉप्टरने 'बचाव अभियान' सुरूही केले होते.

**प्र 1. ला आकृत्या पूर्ण करा!** (2)

1) ईशान आणि त्याच्या सहकाऱ्यांनी यात्रेकरूंना केलेली मदत

- ☐
- ☐
- ☐
- ☐

2) **दुकानदाराने पुढील गोष्टींची सांगितलेली किंमत** (1)

- बिस्किटांचा पुडा → ☐
- पाण्याची बाटली → ☐

3) **चौकटी पूर्ण करा!** (1)

1) याचा तंबू ईशान व मित्रांनी आणला होता

2) हवाईदलाच्या हेलिकॉप्टरने केलेले

4) **खालील वाक्यातील विषेशण ओळखा व लिहा.** (1)

तो जाड व मजबूत दोराच्या साहायाने खाली उतरला.

5) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** (1)

1) बहादुरीच्या कार्यासाठी कोणते पदक दिले जाते ?

2) लोक कोणत्या झाडात अडकले होते ?

**स्वमत** (2)

1) तुम्हाला जाणवलेली ईशानची गुणवैशिष्टये लिहा.

**प्र. 2रा पुढील पाठाच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा!**

मुंबईच्या परळ भागात एक इस्पितळ आहे. ते आहे जनावरांचं इस्पितळ. ते आतून बघायचं असं माझ्या मनात खूप दिवसांपासून होतं. एकदा तो योग आला. कमानीच्या आत तर सहज प्रवेश मिळाला. उजवीकडं एक छोटीशी इमारत दिसते. हे बहुधा कार्यालय असावं. कार्यालयाच्या दाराशीच भिंतीवर एक मोठी तसबीर आहे. त्या तसबिरीत बैल, घोडा, कुत्रा, मांजर, शेळी अशी वेगवेगळ्या जनावरांची चित्रं आहेत. खाली एक छोटंसं पण मनाला भिडणारं वाक्य आहे, 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का?'

माणसाच्या दयाबुद्धीला, करुणेला मुक्या प्राण्यांनी केलेलं ते आवाहन होतं. मला आत कुठंतरी हालवून सोडतं इस्पितळ बघण्यासाठी मी आले आहे, असं मी त्या साहेबांना सांगते. बोक्याचं डोकं कुरवाळत ते माझं ऐकून घेतात आणि लगेच मला परवानगी देऊन टाकतात. इतकंच नाही, तर मला सारं इस्पितळ नीट दाखवण्यासाठी भरत नावाचा एक छोटा चुणचुणीत मुलगाही ते माझ्याबरोबर देतात. आता मी कार्यालयात पाऊल टाकते. समोरच्या कपाटावर उदी रंगाचा एक गलेलठ्ठ बोका मजेत आपल्या मिशा साफ करत बसला आहे. मला बघताच तो कपाटावरून उडी मारतो आणि साहेबांच्या टेबलावर येऊन पाऊल टाकते. एक लहानशा पण स्वच्छ खोली. आपल्या स्वयंपाकघरातले ओटे जेवढ्या उंचीचे असतात तेवढ्या उंचीचे कट्टे आणि त्यांच्याखाली एकेरी जाळीने विभागलेले छोटे छोटे खण. बाहेरच्या बाजूनंही या खणांना जाळ्या बसवलेल्या आहेत. प्रत्येक खोलीत एक एक पेशंट आहे.

एक भलाथोरला काळाभोर बोका आपल्या हिरव्या डोळ्यांनी व्याकुळ नजरेनं बघत आहे. एक कावरंबावरं झालं आहे. एक मांजरी डोळे मिटून पुढल्या दोन पंजांवर तोंड ठेवून गप पडलं आहे. प्रत्येक मांजराजवळ दोन बशा आहेत. एक खाद्यपदार्थासाठी व दुसरी पाण्याची. प्रत्येकाजवळ त्याच्या प्रकृतीतले चढउतार दाखवणारा तक्ता भिंतीवर लावला आहे. प्रत्येकाला बसायला मऊ अंथरुण आहे.

**1) आकृत्या पूर्ण करा.** **(2)**

मांजर विभागात मांजरासाठी असलेल्या विविध सोई →
1. ☐
2. ☐
3. ☐
4. ☐

**2) साखळी पूर्ण करा** **(1)**

1) उदी रंगाचा ☐ बोका

2) भलाथोरला ☐ .. ☐

**3) एका शब्दात उत्तरे लिहा.** **(1)**

1) जनावराचे इस्पितळ मुंबईच्या या भागात ☐

2) चुणचुणीत मुलाचे नाव ☐

**4) स्वमत** **(2)**

माणसाच्या दयाबुद्धीला करूणेला मुके प्राणी कसे आवाहन करतात, तें तुमचा अनुभव तुमच्या शब्दात लिहा.

## अपठित उतारा

**प्र. 3 रा पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नाची योग्य उत्तरे लिहाः** **(3)**

ग्रंथालय हे आजचे देवालय आहे. कपाटातील ग्रंथ हे या देवालयातील दैवत आहे. देवळाच्या पायरीवर किंवा पारावर क्षणभर बसल्यानंतर परस्परांना सहानुभूतीने भेदविहरीत असे आसपासचे क्षेमकुशल समजत होते. आता जीवनाची वाढ झाली आहे. आज आपल्याला साऱ्या जगाची माहिती हवी आहे आणि ती ग्रंथालरूपी देवायलयात मिळते. तिथे लहान, थोर, मुले, बायका सारी माणसे धाव घेतात. ग्रंथालयातील 'देवतांचे' दर्शन घेतल्यानंतर जिवाची तगमग शांत होते व मार्गदर्शन मिळते.

**प्रश्न**

1) आजचे देवालय कोणते आहे ?
2) ग्रंथालयातील देवांच्या दर्शनाने काय साधते ?
3) ग्रंथालयाकडे कोण कोण धाव घेतात ?

## पदय विभाग

**प्र. 4 था पुढील कविता वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती कराः**

**1) आकृती पूर्ण कराः** **(2)**

सानुल्या झुळकेच्या इच्छा ↓
1. ☐
2. ☐
3. ☐
4. ☐

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कधी बाजारी कधी नदीच्या काठी
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलून बघे तो व्हावे पार पसार
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी द्यावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतात पाचुच्या, निळ्या नदीवर शांत
खुलवीत मखमली तरंग जावे गात

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगूज
कणसांच्या कानी सांगावे हितगूज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी
गाळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी

दिनभरी राबुनी दमला दिसता कोणी
टवटवी मुखावर आणावी बिलगोनी
स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा
घ्यावया विसावा यावे मी तिन्हीसांजा

**2) पुढील शब्दसमूहांचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहाः** **(1)**

1) पाचूचे मखमली शेत
2) चुकलीमुकली लेकर

**3) चौकट पूर्ण कराः**

1) झुळूक वेळूच्या बनात वाजवणार आहे (1)
2) झुळूक कणसाच्या कानात सांगणार आहे

**4) कवितेतील जोड शब्द लिहाः** **(1)**

1) ——————— 2) ——————————

**5) 'झुळकेची परोपकारी वृत्ती' तुमच्या शब्दांत लिहाः** **(1)**

**प्र. 5 वा कृती कराः**

या सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले,
झिलमिलणारे चंद्र चांदणे
जगणे मजला शिकवून गेले!

भरकटलेल्या जगात नाही
संस्कारांची जाण कुणाला,
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले!

प्रेम काय ते कुणा न ठावे
नदी सागरा जीव का लावे?
स्वैर होऊनी नदीचे पळणे
जगणे मजला शिकवून गेले!

बुलंद तरीही असे हौसले
पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले!

सागराची अथांगता अन्
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले!

**1) आकृती पूर्ण करा.** **(1)**

कवीच्या अनुभवातले जग

**2) पुढील ओळींचे रसग्रहण करा:** **(2)**

'भरकटलेल्या जगात नाही
संस्काराची जाण कुणाला
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले'

**3) जसे पाखरांची चिवचिव : तसे**

1) पानांची

2) पाण्याची

**4) स्वमत**

1) 'बिनभिंतीची शाळा, लाखो इथले गुरू' हा विचार स्पष्ट करा: (2)

**प्र. 6 वा शब्दकोश म्हणजे काय ? ते सांगून शब्दकोशात काय काय असते, ते स्पष्ट करा**

**प्र. 7 वा समानार्थी शब्द लिहा :** **(1)**

1) चंद्र = 2) देह =

**2) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

1) आधुनिक X

2) प्रशंसा X

**3) लिंग बदला** **(1)**

1) बोका –

2) गाय –

**4) पुढील वाक्ये कंसांतील सूचनांप्रमाणे बदला.** **(2)**

1) आदेश सकाळी शाळेत जातो आणि संध्याकाळी खेळतो.
(वाक्यप्रकार ओळखा)

2) बाई, हा मांजरांचा विभाग तुम्हाला बघायचाय ?
(आज्ञार्थी करा)

**5) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा**

सर्व मित्र टॅक्सीने ऋषिकेशहून उत्तर काशीला पोहचले.

**6) अचूक शब्द लिहा.** **(1)**

1) राष्ट्रपती / राष्टपती / राष्टपति / राष्ट्रपति

2) व्याकुळ / व्याकुल / व्यकूळ / व्याकूळ


**7) योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहाः** **(1)**

ईशान म्हणाला काका आम्हाला एखादी खोली देऊ शकाल

**प्र. 8 वा** **उपयोजित लेखन**

**पुढीलपैकी एका विषयावर सुमारे दहा ओळी निबंध लिहाः** **(4)**

1)




2) कुत्राच्या पिल्लाचे मनोगत

कुत्राचे पावसात सापडणे – मुलांच्या –
दरवाजात थांबणे – पावसातले कष्ट कष्ट
मुलांना सांगणे – थंडी, भूक यांनी हैराण
मुलांनी आत घेणे. खाऊ पिऊ घालणे –
माणसाच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त

**3) आपले राष्ट्रीय सण**


धर्मांची रेलचेल –– धार्मिक महत्त्व –– राष्ट्रीय सणांना वेगळे महत्त्व –– भारतीयांचे आदय कर्तव्य ––– स्वातंत्र दिन, प्रजासत्ताक दिन, हुतात्मा दिन इत्यादी –– सण का साजरे करायचे ? अभिमान जागृती –– राष्ट्रीय कर्तव्य परिणाम.

**प्र. 9 वा पत्रलेखन** **(4)**

तुमच्या शाळेसाठी पुस्तके खरेदी करण्यासाठी मुख्याध्यापकांनी दिलेल्या तपशिलांनुसार पुस्तकांसाठी मागणी पत्र तयार करा.

**प्र. 10 वा सूचनाफलक तयार करा** (4)

घाटातून जाताना घ्यायची काळजी याविषयीचे सूचनाफलक तयार करा



**किंवा**

**पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा व शिर्षक द्या.** **(4)**

(मुद्दे : टोपीविक्या –– नेहमीप्रमाणे टोप्या विकण्यासाठी गावोगावी ––– वाटेत झाडाखाली झोपतो –– वानर टोप्या पळवतात –– टोपीविक्या युक्ती करतो ––– वानर फसत नाहीत –– वानर कारण सांगतात.)

***